ISSN: 2393-8900 IMPACT FACTOR : 1.9152(UIF) VOLUME - 4 | ISSUE - 4 | DECEMBER - 2017

HISTORICITY RESEARCH JOURNAL

# मुख्य प्रवाही इतिहासलेखन व डॉ. बाबासाहेब आंबेडकर एक समीक्षा

प्रवीण बोरकर
सहाय्यक प्राध्यापक, इतिहास विभाग, आर. के. तलरेजा महाविद्यालय, उल्हासनगर, मुंबई विद्यापीठ, मुंबई



**विषय ओळख:**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे आधुनिक भारतातील सुपरिचित विद्वान व्यक्तिमत्त्व, राजकारणी, समाजकारणी, कायदेपंडित, मानववंश शास्त्रज्ञ, समाजसुधारक, न्याय हक्कांचे पुरस्कर्ते, भारतीय संविधानाचे शिल्पकार होते. आजघडीला डॉ. आंबेडकरांची सांगितली जाणारी ही ओळख महत्त्वाची तर आहेच पण यासोबतच डॉ. आंबेडकर हे उच्च प्रतीचे अर्थशास्त्रज्ञ व इतिहासकार होते ही ओळखही महत्त्वाची आहे.परंतु ही ओळख जनमानसात रुजलेली नाही. भारताच्यामुख्य प्रवाही अकादामिक क्षेत्रातील अर्थशास्त्र व इतिहासाच्या पुस्तकातून व विद्यापीठीय अभ्यासक्रमातून एक अर्थशास्त्रज्ञ व इतिहासकार वा इतिहासाचे भाष्यकार म्हणूनही त्यांच्या विचारांचा व लेखनाचा अंतर्भावफारसा केलेला दिसत नाही. असे न करणे म्हणजे एका राष्ट्रपुरुषाच्याविचारांशी केलेली ती प्रतारणा तर आहेच, सोबतच करोडो भारतीयांना डॉ. आंबेडकरांच्याविचारांपासून अलिप्त ठेवण्याचा प्रयत्नदेखिल आहे.

**उद्देश :**

यालेखाच्या माध्यमातून भारतीयइतिहास लेखनातील मुख्य प्रवाहांनी आंबेडकरांच्यावास्तवदर्शी इतिहास लेखनाला कसे दूर सारले हे सांगण्याचा प्रयत्न केलेलाअसून त्याची कारणमीमांसा केलेली आहे.

**मुख्य शब्द :**

डॉ. आंबेडकर, राष्ट्रवादी, मार्क्सवादी,सबाल्टर्न, जात, धर्म, वर्ण, इतिहास लेखन प्रवाह, दलित स्टडीस, अब्राह्मणी, मूलनिवासीइत्यादी.

**समीक्षा:**

भारतात इतिहास लेखनाचे अनेक प्रवाह आजघडीला अस्तित्त्वात आहेत. त्यापैकी राष्ट्रवादी, मार्क्सवादीवसबाल्टर्न हे प्रवाह सर्वाधिक प्रचलित प्रवाहआहेत. यातील प्रत्येक प्रवाहाची वैचारिक बैठक व इतिहास विश्लेषणाचीठराविक अशी पद्धत आहे. त्या ठराविक पद्धतीनुसार या प्रवाहातील लेखक इतिहासाची मांडणी करीत असतात.ब्रिटीश इतिहासकारांनी प्रामुख्याने'जेम्स मिलने' त्याच्या 'History of British India'मधूनहिंदूच्या संस्कृतीला कमी लेखण्याचा जो प्रकार केला, त्याची प्रतिक्रिया व आत्मसन्मान जागृत करण्याचा प्रयत्न, हिंदू संस्कृतीचा अभिमान म्हणून राष्ट्रवादी इतिहास लेखनाचा प्रवाह पुढे आला. १९५० नंतरच्या काळात भारतात मार्क्सवादी इतिहास लेखनाला गती मिळाली. ह्या प्रवाहाच्या इतिहासकारांनी इतिहासाच्या उपलब्ध साधन व माहितीचे मार्क्सवादी दृष्टीकोनातून लेखन व विश्लेषण करायला प्रारंभ केला. विसाव्या शतकाच्या शेवटी इतिहास लेखनाचा सबाल्टर्न प्रवाह अस्तित्त्वात आला. तळागळातीललोकांची व समूहाचीमाहिती करून घेतल्याशिवाय तत्कालीन इतिहासाचे नीट आकलन होणार नाही या दृष्टीकोनातून त्यांनी इतिहास लेखनाला प्रारंभ केला. असे असले तरी उपरोक्त इतिहास लेखन पद्धतींनी भारताच्या 'जात' वास्तवतेकडे दुर्लक्ष केल्यामेव इतिहासलेखनातदलित

बहुजनांच्या कर्तृत्त्वाचेमहत्त्वमापन न केल्याने भारतीय इतिहासात एक मोठी दरी निर्माण झाली. या पार्श्वभूमीवर डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे इतिहास विषयकलेखन महत्त्वाचे ठरते.

राष्ट्रवादीचौकटीत लिहिणारे इतिहास लेखक भारतीय इतिहासाचे 'हिंदुकरण करण्यावर भर देतात. भारताचा इतिहास हा कसा हिंदू इतिहास होता किती गौरवशाली संस्कृती होती, त्यावर मुस्लिमांनी व पुढे ब्रिटिशांनी आधिपत्य मिळवून कसा तिचा अध्पात केला हे सांगण्यावर व हिंदुत्त्वाचे श्रेष्ठत्त्व व अभिमान बाळगण्यावर या लेखकांचा भर असतो.'जात', 'अस्पृश्यता' 'भेदभाव' हे त्यांच्या दृष्टीने महत्त्वाचे विषय नाहीत. प्रवीण चव्हाण यांच्या मते, "मुख्यतः हिंदू आणि उत्तर भारत यावरच या इतिहासाने लक्ष केंद्रित केले. हे लिखाण ब्राह्मणी आणि पुरुषप्रधान चौकटीतच अडकले. फुले, आंबेडकर, मतुआ पंथ, नामशुद्र चळवळ, स्वाभिमान चळवळ यासारख्या बाबींचा वेध त्यांनी घेतला नाही. एकूणच १९५० पर्यंतच्या रँकेच्या (No Document No History) चा प्रभाव या इतिहासावर राहिला.[१] मार्क्सवादी इतिहासकार सुद्धा जातीच्या प्रश्नाकडे दुर्लक्ष करतात. त्यांना जातीपेक्षा वर्ग महत्त्वाचा वाटतो.ब्राह्मणी चष्म्यातून त्यांनी भारताच्या इतिहासाकडे बघितले आहे. आनंद तेलतुंबडे यांच्या मते, "साम्यवाद्यांची भारताविषयीची समज दोन टोकांमध्ये झुलत आलेली दिसते त्याचे एक टोक म्हणजे पाश्चिमात्यांकडून उसनवारीवर घेतलेले भारताविषयीची ज्ञान आणि दुसरे टोक म्हणजे मुलतः ब्राह्मणी चष्म्यातून भारताचा झालेला इतिहासाचा अन्वयार्थ. ब्राह्मणी चष्म्यालाया देशातील जातिव्यवस्थेबद्दल काहीही वाईट वाटलेलं नाही; जातीव्यवस्थेचे त्याने धार्मिक आधारापासून ते आर्थिक आधारापर्यंत(श्रम विभागणी) समर्थनच केलेले आहे.हे दोन्ही प्रकारचे समज दलितांच्या दृष्टीकोनाला मारक ठरतात, त्यांच्या मुक्तीच्या महत्त्वाकांक्षेला हीन लेखतात."[२] वंचितांचासमजला जाणारा सबाल्टर्न इतिहास प्रवाह सुद्धा यापेक्षा निराळा नाही. डॉ. उमेश बगाडे यांच्या मते, "सबाल्टर्न इतिहासकारांनी जातीच्या संस्थात्मक बाजूकडे पाठ फिरवून जातजाणिवेच्या काही स्फुट पैलूंचेच विश्लेषण करण्यावर समाधान मानलेले दिसते. लक्षणीय म्हणजे, विद्रोहासाठी ऐक्य घडवणारा व विद्रोहाचा प्रसार घडवून आणणारा घटक म्हणून जातीचा अभ्यास सबाल्टर्न इतिहासकारांनी जसा केला तसा शोषित-अंकित जातींचा विद्रोह त्यांच्या अभ्यासाचाविषय बनला नाही."[३]

डॉ. आंबेडकर हे पारंपारिक अर्थाने व्यावसायिक इतिहासकार नसले तरी त्यांनी लिहिलेली अनेक पुस्तके त्यांना आधुनिक तर्काधारित बुद्धिवादी इतिहासकार म्हणून स्थापित करण्यात व पुरेशी आहेत. डॉ. आंबेडकरांनी लिहिलेल्याइतिहास विषयक पुस्तकांमधून ज्या पद्धतीची मांडणी त्यांनी केली, ती तत्कालीन मांडणीपेक्षा निश्चितच वेगळी असूनउच्च दर्जाचे संशोधन कसे असावे याचा आदर्श घालून देणारी आहे.डॉ. आंबेडकरांनीबुद्धिवादीदृष्टीने लेखनकेलेले आहे.त्यांनीधर्म, वर्ण, जात, संस्कृती, अस्पृश्यता, गुलामी, धर्मशास्त्रे, विषमता, यांची परखड चिकित्सा करून'मानवी प्रतिष्ठा' प्रस्थापित करण्याचा प्रयत्न केला आहे.असेअसले तरी त्यांना व त्यांच्या लेखनाला योग्य स्थान मिळू शकले नाही.गेल आम्वेट अगदी योग्य लिहितात की, "अपनी आर्थिक तथा सांस्कृतिक विश्लेषण की क्षमता के कारण अंबेडकर को पहली पंक्ति के लोगों कीक़तार में खड़ा होना चाहिए था जिन्होंने अपने विचारों से देशका निर्माण किया। लेकिन उन्हें वह स्थान शायद ही मिल सका।"[४] डॉ. आंबेडकरांनीबुद्ध, कबीरव महात्मा फुल्यांना गुरुस्थानी मानून, त्यांच्याचैचारिक परंपरेला त्यांनी खंबीरपणेपुढेनेले.त्यांचेसमकालीनअनेक इतिहासकार राष्ट्रवादाच्या नावाखाली इतिहासाचे'हिंदुकरण व मार्क्सवादाच्या नावाखाली इतिहासाचे 'मार्क्सवादीकरण' करण्यात गुंतली असतांना डॉ आंबेडकर मात्र बुद्धिवादी दृष्टीने भारताच्या इतिहासाकडे विशेषतः 'प्राचीन इतिहासाकडे' बघतात, व त्याचे पुनर्लेखन व नवी मांडणी करून प्राचीन भारताच्या इतिहासाला एक नवा आयाम देतात. असे असले तरी डॉ. आंबेडकरांच्या लेखनाबाबत मुख्य प्रवाही इतिहास लेखनानेदखल घेतलेलीदिसतनाही.डॉ. आंबेडकरांच्या लेखनाचा अंतर्भाव विद्यापीठीय व महाविद्यालयांच्या इतिहासाच्या अभ्यासक्रमात केलेला आढळत नाही. इतिहासलेखनशास्त्राच्या पुस्तकांमध्येही डॉ आंबेडकरांच्या लेखनाचा साधा नामोल्लेखही होतनाही.अरुंधती रॉय यांच्या मते, "इतिहास आंबेडकरांच्या बाबतीत निर्दयीराहिला आहे. आधी त्यांना दाबून टाकण्याचा प्रयत्न झाला आणि नंतरत्यांचं गौरवीकरण करण्यात आलं. इतिहासानं त्यांना अस्पृश्यांचा नेता बनवलं त्याचं लेखन लपवलं गेलं. त्यांची परिवर्तनवादी बुद्धिमत्ता व तप्त उर्मटपणा दूर ठेवण्यात आला.इतिहासाच्या अनेक विषयांसंदर्भात मूलगामी संशोधन करून सुद्धा असे का घडावे हा महत्त्वाचा प्रश्न आहे."[५]

भारतीय समाज हा प्रामुख्याने अनेक जातींमध्ये विभागलेला आहे. येथील समाजजीवनाचेमहत्त्वाचे लक्षण म्हणजे 'जात' होय. भारतीय इतिहासाची मांडणी वा लेखन करीत असतांना जात या घटकालाविसरूनचालणार नाही. मात्रभारतीय इतिहासाच्या विश्लेषण करणाऱ्या राष्ट्रवादी, मार्क्सवादी व सबाल्टर्न या इतिहास पद्धतींनी जात या घटकाकडे सोयीस्करपणे दुर्लक्ष केले. त्यामुळे भारतीय इतिहासाचे सम्यक आकलन होत नाही. भारतातीलअग्रगण्य व्यावसायिक इतिहासकारांनी डॉ. आंबेडकरांच्या इतिहास लेखन व त्यांच्या दृष्टीकोणाचा विचार केलेलादिसत नाही. डॉ. अनिरुद्ध देशपांडे यांच्या मते, १९५० पासून ते १९७० पर्यंत इतिहास लेखनाच्या क्षेत्रात

मार्क्सवाद व राष्ट्रवादाचे वर्चस्व असल्याने, आंबेडकरांवर विशेष लक्ष दिलेनाही. राष्ट्रवादी लोकांसाठी 'राष्ट्र' तर मार्क्सवादी लोकांसाठी 'वर्ग' महत्त्वाचाहोता. मार्क्सवादी व राष्ट्रवाद्यांनाभारतीय इतिहासात जातींची भूमिका व अंत्यज जातींच्या समस्यांकडे बघण्याची सवड नव्हती. १९८०च्या दशकात भारतीय समाजवैज्ञानिकांचाएक प्रभावशाली समूह ज्यात इतिहासकारांचाही समावेशहोता, तेभाषा, संस्कृती व स्त्रियांच्या प्रश्नात गुंतून पडले यामुळेही डॉ. आंबेडकरांना इतिहासकार म्हणून गंभीरतेनेघेतले गेल्याचे दिसत नाही.[६]

डॉ. आंबेडकरांनीऐतिहासिकदृष्टीने महत्त्वपूर्ण अशा अनेक विषयांवर लिखाण केले. उदा.Annihilation of Caste, Ranade, Gandhi and Jinnah, Philosophy of Hinduism, Revolution and Counter Revolution, Who were the Sudras?Pakistan or the Partition of India, The Buddha and his Dhamma, The Untouchable: who were they and why they become Untouchablesइत्यादी. असे असले तरी मुख्य प्रवाही इतिहासलेखन पद्धतीच्या इतिहासकारांनी डॉ. आंबेडकरांच्या लेखन व त्यांच्या विचारांना फारसे महत्त्व दिलेलेदिसत नाही. दिल्ली विद्यापिठातील सहयोगी प्राध्यापक असलेले डॉ. अनिरुद्ध देशपांडे यांच्या मते, "मुझे याद नहीं है कि सन१९८० के दशक में, जब मैं दिल्ली के जवाहरलाल नेहरू विश्वविद्यालय के इतिहास अध्ययन केंद्र-जो कि, देश में इतिहास में शोध का सर्वश्रेष्ठ माना जाता है- मै पढ़ रहा था, तब मेरे किसी भी सम्मानित मार्क्सवादी प्रोफेसर नेआंबेडकर का इतिहासविद के रूप में कभी हवाला दिया हो. और ना ही मैंने कभी भारत के किसी कॉलेज या विश्वविद्यालय में आंबेडकर को जवाहरलाल नेहरू की तरह इतिहासविद के रूप में याद किये जाते देखा है। दिल्ली विश्वविद्यालय के इतिहास विभाग, जहाँ सन २००९ से मैं इतिहास के स्नातकोत्तर और शोधरत विद्यार्थियों को पढ़ाता आ रहा हूं, में भी इतिहासविद के रूप में आंबेडकर को कोई मान्यता नहीं दी जाती। यह इस तथ्य के बावजूद कि भारतीय जाति व्यवस्था के इतिहास की उनकी विवेचना अनूठी है।"[७]असे का घडावे हा महत्त्वाचा प्रश्न आहे. डॉ. आंबेडकर हे अस्पृश्य समाजातून पुढे आले होते त्यांनी संपूर्ण आयुष्यभर सामाजिक न्यायासाठी संघर्ष केला, मात्र त्यांच्या लेखनाला मुख्य प्रवाही इतिहासकारांनी न्यायदिलेला नाही.बाळ गंगाधर टिळक, महात्मा गांधी, जवाहरलाल नेहरू या नेत्यांच्या लेखनाचा ज्याप्रमाणे इतिहास विश्लेषणात विचार केला जातो, तसा विचार डॉ. आंबेडकरांच्या लेखनाचा होतांना दिसत नाही.त्यांच्या साहित्याबाबही असेच घडले आहे. अरुंधती रॉय यांच्या मते, "आंबेडकरांनी विपुल लेखन केलं. दुर्दैवानं गांधी नेहरू किंवा विवेकानंद यांच्या साहित्याप्रमाणेआंबेडकरांचसाहित्य ग्रंथालयांमधील किंवा पुस्तक-दुकानांमधील कपाटांमध्ये सहज दिसत नाही"[८]ज्या विषमताग्रस्त समाजातील भेदभावाच्या विरोधात आंबेडकरांनी जीवनभर संघर्ष केला त्यांचे लेखन त्याच प्रकारच्या भेदभावाला बळी पडले**ले** दिसते.

ज्या प्रमाणे गांधीजींच्या 'The Story of My Experiments with Truth' यापुस्तकाला, नेहरूंच्या 'Discovery of India' या पुस्तकाला तर टिळकांच्या 'GeetaRahasya' व'The Arctic Home In The Vedas' या पुस्तकांना इतिहासामध्ये संदर्भ ग्रंथवा महत्त्वपूर्ण पुस्तके म्हणून स्थान मिळाले तसेस्थान मात्र डॉ. आंबेडकरांच्यापुस्तकांबाबतझालेले दिसत नाही.ऐंशीच्या दशकात महाराष्ट्र सरकारने डॉ. आंबेडकरांच्या लेखनाचे खंड प्रकाशित करून मोठे कार्य केले.यानंतरच्या काळात अकादामिक क्षेत्रात आंबेडकरी विचार व लेखनावर मोठे कार्य झाले.असे असूनही मुख्यप्रवाही इतिहास व समाजविज्ञानक्षेत्रात पाहिजेतशी मान्यता त्यांच्या लेखनाला मिळाली नाही.रामनारायण रावत व के. सत्यनारायण यांच्या मते, "Since the 1990s Ambedkar has attracted considerable academic attention, but his theoretical contribution have not yet been sufficiently appreciated in the mainstream social science disciplines."[९]डॉ. आंबेडकरांच्याऐतिहासिक लिखाणाबरोबर त्यांचे अर्थशास्त्रीय लेखनाचीही तीच गत झाली.

डॉ. आंबेडकरांनीधर्मग्रंथांचीचिकित्सा केली,ज्या प्रथा व परंपरांना व गैरसमजुतींना तत्कालीन हिंदू समाज बळी पडला होता त्याची कटू समीक्षा करून'वैचारिक क्रांती'घडवून आणली. संस्कृती महात्म्य, ग्रंथ प्रामाण्य, धर्म गौरव व भूतकाळाचे उदात्तीकरण करण्यात गुंतलेल्या इतिहास लेखकांपेक्षा डॉ. आंबेडकरांचे लेखन निश्चितच वेगळे होते. भूतकालीनइतिहासाच्याप्रेमात असलेल्या, जातीनेवरचढअसलेल्यालेखकांनीडॉ. आंबेडकरकृत इतिहास समीक्षा व त्याची बुद्धिवादी चिकित्सा नाकारली. डॉ. नलिनी पंडित यांच्या मतानुसार, "एकोणिसाव्या शतकात, भारताच्या प्राचीन इतिहासाच्या संशोधनाला जेव्हा प्रारंभ झाला तेव्हा पहिल्या पिढीतील संशोधक उच्चवर्णीयहोते, प्राचीन धर्मग्रंथांबद्दलत्यांच्यामनात आदर व भक्तिभाव होता. शिवाय या सर्व ग्रंथाचे कर्ते ब्राह्मणच होते. या ग्रंथांमध्ये उच्चवर्णियांच्याहितसंबंधांचेसमर्थन केलेले होते; आणि वर्णव्यवस्थेमुळे मिळालेल्या विशेषाधिकारांचा त्याग करण्याची त्यांच्या मनाची तयारी नव्हती. साहजिकच, उच्चवर्णियांच्यासंशोधनावर मर्यादा पडल्या. धर्मग्रंथामध्ये अध्याहृत असलेल्या सामाजिक तत्त्वज्ञानाचीआधुनिक दृष्टीकोनातून निस्पृहपणे त्यांनी चिकित्सा केली नाही."[१०]यामुळेचडॉ. आंबेडकरांच्या लेखनाला भारतीयअभिजनवर्गीय इतिहासलेखकांनीथारा दिल्याचे दिसत नाही.

आधुनिकभारताच्याइतिहासाच्या पुस्तकातून डॉ आंबेडकरांच्या नावाची चर्चा 'दलित सुधारणा', अस्पृश्यांची चळवळ', 'पुणेकरार' व'घटनेच्या मसुदा समितीचे अध्यक्ष' एवढीच मर्यादित राहते.गोलमेज परिषदांचे वर्णन करतांनापहिल्या गोलमेज परिषदेवरजेव्हा गांधीजीवकाँग्रेस बहिष्कार टाकतात व जाण्याचे टाळतात, तेव्हा डॉ. आंबेडकरमात्र गोलमेज परिषदेला कशी हजेरी लावतात याचे वर्णन पुस्तकातून केले जाते.भारताचे विभाजन वा फाळणी यावर लिहितांना जवळपास सर्वच लेखक, गांधी, नेहरूंची भूमिका मांडतात परंतुयासंबंधात्डॉ. आंबेडकरांनी'Thoughts on Pakistan' हा महत्त्वाचा ग्रंथ लिहिलेला असूनही त्यांचे मतवात्यांची भूमिका याचा नामोल्लेखही करीत नाही, ही अतिशय दुर्दैवी बाब आहेराज्यघटना निर्मितीची प्रक्रिया स्पष्टकरतांना आंबेडकर कसे फक्त मसुदा समितीचे अध्यक्ष होते याचीच चर्चा येते. त्यांनी भारताची घटना लिहितांना कसेअहोरात्र परिश्रम घेतले याची चर्चा केली जात नाही.आधुनिकभारताच्या पुस्तकातून गांधींनासर्वांगाने पुढे आणण्यात इतिहासकार धन्यता मानतात.अरुंधती रॉय यांच्या मते, "इतिहास गांधींच्या बाबतीत दयाळू राहिला आहे. त्यांच्या जीवनकाळात लाखों लोकांनी त्यांना देवाचंस्थान दिलं होतं. गांधींचं देवत्व आता वैश्विक बनलं आहे आणि आता हा एक अनाहत परिणाम असल्यासारखं भासतं आहे. ... ओबामांना गांधी प्रिय आहेत आणि 'ऑक्युपाय' आंदोलनालाही गांधी प्रिय आहेत. अराज्यवाद्यांना प्रिय आहेत आणि प्रस्थापित व्यवस्थेलाही ते प्रिय आहेत. नरेंद्र मोदींना ते प्रिय आहेत आणि राहुल गांधीनाही ते प्रिय आहेत. गरिबांना ते प्रिय आहेत आणि श्रीमंतांही ते प्रिय आहेत."[११]

इतिहासाच्या पुस्तकाची शीर्षकबरीच बोलकी आहेत.त्यात गांधी आणि नेहरूंच्या नावाचा कसा उल्लेख होतो हे दिसून येते उदा.'India After Gandhi; The History of the largest Democracy', आणि'India After Nehru; The History of the largest Democracy' हेरामचंद्र गुहा लिखित आधुनिक भारतावरील ग्रंथ. आधुनिक भारताच्या इतिहासात १९०५ ते १९२० या काळालाजहालवाद अथवा 'टिळक काळ', १९२० ते १९४७ या काळाला 'गांधीयुग', तर १९४७ नंतरच्या काळाला 'नेहरू काळ' असे संबोधले जातेनेत्यांच्या नावावरून कालखंडाला ही नावे दिलेली आहेत.यात कुठेही डॉ. आंबेडकरांचे नाव दिसून येत नाही.डॉ. आंबेडकरमुख्यप्रवाही इतिहास लेखनातील प्रमुख घटक न ठरता, उपघटकातील उपघटक ठरतांना दिसतात.काही वर्षांपूर्वी आयबीन या माध्यम समूहाने 'गांधी नंतरचा महान भारतीय कोण' यावर एक देशव्यापी सर्वेक्षण केले होते. त्यातबहुसंख्य मतांच्या आधारे 'डॉ. आंबेडकर' हे गांधीनंतरचे महान भारतीय ठरले होते.इथेआयबीएन समूहाला गांधी नंतरचा महान व्यक्ती शोधायचा होता, म्हणजे गांधींच्या समकालीनांपैकीकुणीही'महान' या श्रेणीत बसत नाहीत हेच त्यांना सांगायचे होते

आंबेडकरी विचारांची बांधिलकी मानणाऱ्या अभ्यासकांमध्ये व बुद्धीजीवी वर्गामध्ये एकसूत्रता नसल्याने व आंबेडकरवादाच्या जोडीला मार्क्सवादाची फोडणी देण्याचा व सांधण्याचा प्रकार असल्याने, दलित साहित्य व 'दलित अभ्यासपद्धती'(Dalit Studies) हा विचारसुत्र, 'मूलनिवासी' ('बामसेफ' नामक अनुसुचित जाती, जमाती, इतर मागास वर्ग, धार्मिक अल्पसंख्यांकांचे संघटन असलेल्या संघटनेने मांडलेली संकल्पना) विचारसुत्र, 'अब्राह्मणी' (हा विचार ब्राह्मणेतर चळवळीच्या काळात महाराष्ट्रात पुढे आला कॉ. शरद पाटील यांनी याला बळकटी दिली)विचारसूत्रव यासारखे इतर तत्सम विचारसूत्र अस्तित्त्वात असल्याने व त्यात सर्वांना आंबेडकरी विचार थोड्याफार फरकाने मान्य असला तरी परस्परांमध्येअंतर्विरोधअसल्याने आंबेडकरीपद्धतीशास्त्र विकसित झाल्याचे दिसत नाही.

डॉ. आंबेडकरांवरील लेखनाच्या संदर्भात महत्त्वाची बाब म्हणजेआजघडीलादलित वर्गाने शिक्षणात प्रगती केली असली तरी अकादमिक क्षेत्रात अजूनही त्यांना फार काही जम बसविता आला नाहीयासाठी उच्चभ्रूंच्याकॉलेजमधील आढळणारे दलितांचे नगण्य प्रमाण, इंग्रजी भाषेचा जाणवणारा अभाव ह्या बाबीही कारणीभूत आहेत. यावररामनारायण रावत व के. सत्यनारायण यांचे 'Dalit Studies' या पुस्तकातील निरीक्षण महत्त्वाचे आहे. त्यांच्या मते, "The emergence of a new generation of scholars- both Dalit and non-Dalit-who do not belong to the traditional elite of India. They do not study at elite colleges in India such as the St. Stephen's, the Lady Shri Ram, or the Presidency, and they do not have PhDs from English institutions such as Oxford and Cambridge, which is characteristic of Indian academia. Another crucial feature of this group is that for the majority of them English is not their first language; they learned it in college."[१२]डॉ. आंबेडकरांवर लेखन करणारेवसंत मून, गेल आम्वेट, एलीनार झेलियट, कांचा इलाया, सुखदेव थोरात, भालचंद्र मुणगेकर, नरेंद्र जाधव, शर्मिला रेगे, अरुंधती रॉय, असे काही सन्माननीयअपवाद वगळता आजही दर्जेदार लेखनाची गरज आहे. डॉ. आंबेडकरांवरील अधिकाधिक लेखनातून मुख्य प्रवाही इतिहास लेखनात आंबेडकरांच्या अंतर्भावाची शक्यता निर्माण होते.

**निष्कर्ष:**

एकंदरीत डॉ. आंबेडकरांनी जात, धर्म, वर्ण, अस्पृश्यता, स्त्रीदास्य, धर्मशास्त्र, हिंदू धर्मीय रूढीपरंपरांचीबुद्धिवादीचिकित्सा केल्याने, कटू आलोचना केल्याने त्यांच्या लेखनाकडे पूर्वग्रह्दुषित भावनेने बघिलेले गेले, जातीय दंभ असलेल्या लोकांनी आंबेडकरांच्या लेखनाला 'हिंदुविरोधी ठरविले, उच्चजातीयअभिजनवर्गाची एकाधिकारशाही अकादमिक क्षेत्रात असल्याने त्यांनी डॉ. आंबेडकरांच्या लेखनाचा विचार केला नाही.आंबेडकरांच्या व्यक्तिमत्त्वाला 'राजकीय' रंग देवून त्याचा वापर फक्त राजकारणासाठी व मतांसाठी केल्याने त्यांच्या इतिहास विषयक लेखनाकडे दुर्लक्ष करण्यात आले. आंबेडकरांच्या लेखनाचा विचारन करता त्यांचे गौरवीकरण करूनव्यक्तीपूजा, पुतळे, स्मारके बांधण्यातच मोठी धन्यता मानण्यात आली. हिंदूंच्यारामराज्या' पेक्षा(गांधीजींची रामराज्याची संकल्पना व राष्ट्रीय स्वयंसेवक संघाची रामराज्याची संकल्पना यात तफावत आहे) आंबेडकरांना'कायद्याचे राज्य' (भारतीय संविधानावर आधारित)जास्त महत्त्वाचे वाटत होते, आजही अभिजनवर्गीयहिंदूना'भारतीय संविधानाविषयी' आपुलकी वाटत नाही.यामुळेही आंबेडकरांचे लेखन मुख्यप्रवाही इतिहास लेखनाचा चिंतनाचा विषय झालेला दिसत नाही.

डॉ. आंबेडकरांनी विपुल प्रमाणात लेखन केले.त्यांनी भारतीय इतिहासाची नवी मांडणी केली, किंबहुना भारतीय इतिहासालानवा अर्थ देणारे पद्धतीशास्त्र विकसित केले. या पद्धतीला 'आंबेडकरी पद्धतीशास्त्र' (Ambedkarait Methodology) अथवा(AmbedkaraitHistoriography) 'आंबेडकरी इतिहासलेखन शास्त्र) असेही म्हणता येईल. भारतीय इतिहासलेखनाचा विचार करतांना डॉ. आंबेडकरांना अव्हेरून चालणार नाही.त्यांचेया क्षेत्रातील कार्य मोलाचे असून त्यावर वारंवारचर्चा, पुनर्लेखन, विचारविनिमयकरून त्यांच्या विचारसुत्राला केंदीभूत मानून इतिहासाचे लेखन, विश्लेषण,फेरमांडणी व भाष्य करण्याची गरज आहे. याद्वारेभारतीयइतिहासाची एक मोठी कोंडीफोडण्यास मदत मिळेल.

**संदर्भ:**


१. चव्हाण प्रवीण (ले.) 'सबआल्टर्नइतिहास: सामर्थ्य, शक्यता आणि मर्यादा, परदेशी प्रतिमा व भागवत विद्युत (संपा.), अब्राह्मणी स्त्रीवादी इतिहासाच्या दिशेने, सुगावा प्रकाशन, पुणे, द्वितीयआवृत्ती, २०१५, पृ. १४३
२. तेलतुंबडेआनंद, साम्राज्यविरोध आणि जातिविनाश, सुगावा प्रकाशन, पुणे, प्रथम आवृत्ती, २००७, पृ. २७
३. बगाडे उमेश,सबाल्टर्नस्टडीज् व भारतीय इतिहासलेखनातीलस्थित्यंतर, इतिहास लेखन मीमांसा, निवडक समाजप्रबोधन प्रत्रिका : खंड १, लोकवाङमय गृह, मुंबई, पहिली आवृत्ती२०१०,पृ.९६
४. गेल आम्वेट, अंबेडकरप्रबुद्ध भारत की ओर, पेंगुइनबुक्स इंडिया,गुड़गांव, २००५, पृ. १५३
५. रॉय अरुंधती, वंश, जात व जातिव्यवस्थेचे उच्चाटन, सुगावा प्रकाशन, पुणे, नोव्हेंबर २०१६, पृ. ३०
६. www.forwardpress.in /2016/o4, देशपांडेअनिरुद्ध, डॉ. आंबेडकर: एक अभावुक इतिहासविद, एप्रिल १४, २०१६,
७. कित्ता
८. रॉय अरुंधती, वंश, जात व जातिव्यवस्थेचे उच्चाटन, पृ. २४
९. रावत रामनारायण व सत्यनारायण के., दलितस्टडीस, परमनेंटब्लैक, रानीखेत, २०१७, पृ. २७
१०. पंडित नलिनी, आंबेडकर, ग्रंथालीप्रकाशन, मुंबई, पुनर्मुद्रणआक्टोबर२००५, पृ. १०९
११. रॉय अरुंधती, वंश, जात व जातिव्यवस्थेचे उच्चाटन,पृ. २७
१२. रावत रामनारायण व सत्यनारायण के., दलितस्टडीस, प्रस्तावना, पृ. ३